# मनोहरभाई पटेल कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, साकोली

## सांस्कृतिक विभाग अहवाल

## सत्र २०२३ –२४

### लोकमान्य टिळक पुण्यतिथी आणि अन्नाभाऊ साठे जयंती

सांस्कृतिक विभागाच्या वतीने दि. ०१ ऑगस्ट २०२३ रोजी सकाळी ११.०० वाजता भारतीय असंतोषाचे जनक लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांची पुण्यतिथी आणि लोकशाहीर अन्नाभाऊ साठे यांची जयंती महाविद्यालयात संयुक्तिकरीत्या साजरी करण्यात आली. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान प्राचार्य डॉ. सी. जे. खुणे यांनी भूषविले. प्रमुख वक्ते प्रा. डॉ. एम. बी. सोनकुसरे, प्रा. डॉ. नूतन चव्हान, प्रा. के. बी. साठवणे हे उपस्थित होते. याप्रसंगी प्रमुख वक्त्यांची यथोचित भाषणे झालीत. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन प्रा. नवाजी घरत यांनी केले तर आभारप्रदर्शन प्रा. विलास भावे यांनी केले. कार्यक्रमाला सर्व प्राध्यापकवृंद, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थ्यांची उपस्थिती होती.

### भारतीय स्वातंत्र्य दिन

दि. १५ ऑगस्ट २०२३ रोजी मनोहरभाई पटेल कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, साकोली येथे भारतीय स्वातंत्र्य दिन साजरा करण्यात आला. कार्यक्रमाचे अध्यक्षमहोदय प्राचार्य डॉ. सी. जे. खुणे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. प्रमुख अतिथी म्हणून प्राध्यापक परिषदेचे सचिव प्रा. डॉ. सी. एम. टेंभूर्णीकर, प्रा. डॉ. अमीत टेंभूर्णे होते. प्राचार्य महोदयांनी एन. सी. सी. कॅडेट्सना शपथ दिली. आपल्या अध्यक्षीय भाषणातून स्वातंत्र्याठी बलीदान दिलेल्या हुतात्म्यांना वंदन करून स्वातंत्र्याचे महत्व पटवून दिले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. नवाजी घरत यांनी तर आभारप्रदर्शन शारीरिक शिक्षण संचालक डॉ. अमीत टेंभूर्णे यांनी मानले. कार्यक्रमाला सर्व प्राध्यापकवृंद, शिक्षकेत्तर कर्मचारी आणि विद्यार्थी उपस्थित होते.

Scanned with CamScanner

## स्वर्गीय मनोहरभाई पटेल स्मृतिदिन

गुरूवार, दि. १७ ऑगस्ट २०२३ रोजी गोंदिया शिक्षण संस्थेचे संस्थापक स्व. मनोहरभाई पटेल यांचा ५३ वा स्मृतीदिन मनोहरभाई पटेल कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, साकोली येथे घेण्यात आला. या स्मृतीदिनानिमित्त महाविद्यालयीन प्राध्यापकांच्या वतीने महाविद्यालयात शिक्षण घेत असणाऱ्या अपंग, अनाथ व गरजू होतकरू विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य मदत वाटपाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान महाविद्यालयाचे प्राचार्य आदरणीय डॉ. सी. जे. खूणे यांनी भूषविले. प्रमुख अतिथी प्रा. डॉ. एल. पी. नागपूरकर सर, प्रा. डॉ. एम. बी. सोनकुसरे सर, प्राध्यापक परिषदेचे सचिव प्रा. डॉ. सी. एम. टेंभूर्णीकर सर, तसेच प्रा. के. बी. साठवणे सर होते. कार्यक्रमाच्या सुरवातीला स्व. मनोहरभाई पटेल यांच्या प्रतिमेचे पूजन व माल्यार्पण करून आदरांजली वाहण्यात आली.

याप्रसंगी प्रमुख वक्ते, अतिथी व अध्यक्षमहोदयांची यथोचित भाषणे झालीत. कार्यक्रमाचे यशस्वी सूत्रसंचालन प्रा. नवाजी घरत यांनी केले तर आभारप्रदर्शन डॉ. खुशाल बोरकर यांनी मानले. कार्यक्रमाला सर्व प्राध्यापकवृंद, शिक्षकेत्तर कर्मचारी आणि विद्यार्थी होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सर्वांचे सहकार्य लाभले.

## शिक्षक दिन :

दि. ५ सप्टेंबर २०२३ रोजी मनोहरभाई पटेल कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, साकोली येथे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सी. जे. खुणे सर यांच्या अध्यक्षतेत डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांचा जन्मदिवस 'शिक्षक दिन' म्हणून साजरा करण्यात आला. महाविद्यालयात शिक्षक दिनानिमित्त विद्यार्थी (शिक्षक) अध्यापण स्पर्धा संपन्न झाली. यात सर्व वर्गातील विद्यार्थ्यांनी आपला सहभाग नोंदविला. प्राचार्य डॉ. सी. जे. खुणे सर यांनी विजेत्या स्पर्धकांचा गौरव केला. स्पर्धेचे आयोजन प्रा. राजीव मेश्राम यांनी केले.

## राष्ट्रपिता महात्मा गांधी आणि लालबहादूर शास्त्री जयंती

दि. २ ऑक्टोबर २०२३ रोजी मनोहरभाई पटेल कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, साकोली येथे राष्ट्रपिता महात्मा गांधी आणि लालबाहादूर शास्त्री यांच्या जयंतीचा कार्यक्रम घेण्यात आला. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान प्राचार्य डॉ. सी. जे. खुणे यांनी भूषविले. याप्रसंगी अध्यक्षमहोदयांनी महात्मा गांधी तसेच लालबहादूर शास्त्री यांना देशासाठी केलेल्या कार्यावर, त्यांच्या विचारावर प्रकाश टाकून मोलाचे मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सांस्कृतिक विभागप्रमुख प्रा. नवाजी घरत यांनी केले तर आभार डॉ. दिपक साखरे यांनी केले. कार्यक्रमाला सर्व प्राध्यापकवृंद, शिक्षकेत्तर कर्मचारी आणि विद्यार्थी उपस्थित होते.

Scanned with CamScanner

## महापरिनिर्वाण दिन

दि. ६ डिसेंबर २०२३ रोजी मनोहरभाई पटेल कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, साकोली येथे प्राचार्य डॉ. सी. जे. खुणे सर यांच्या मार्गदर्शनात भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनी आदरांजली वाहण्यात आली. याप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान प्रा. डॉ. मनोज सोनकुसरे यांनी भूषविले. 'शिका, संघटीत व्हा, आणि संघर्ष करा, ध्येयपूर्ण होईपर्यंत थांबू नका' असा मोलाचा महामंत्र देणारे डॉ. बाबासाहेब यांचे व्यक्तिमत्व किती परिपूर्ण आहे. याची जाणीव आपल्या अध्यक्षीय भाषणातून करून दिली. प्रमुख अतिथी प्रा. डॉ. नूतन चव्हान, प्रा. के. बी. साठवणे सर हे होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सांस्कृतिक विभागप्रमुख प्रा. नवाजी घरत यांनी केले तर आभार प्रा. डी. ए. गहाणे यांनी केले. कार्यक्रमाला सर्व प्राध्यापकवृंद, शिक्षकेत्तर कर्मचारी आणि विद्यार्थी उपस्थित होते.





### एम.बी.पटेल कॉलेज, साकोली



**सेंदूरवाफा** ■ मनोहरभाई पटेल महाविद्यालय साकोली येथे महापरिनिर्वाण दिनानिमित्त महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ.सी.जे.खुणे यांच्या मार्गदर्शनात भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला माल्यार्पण करून अभिवादन करण्यात आले.

याप्रसंगी प्रा.डॉ.मनोज सोनकुसरे, प्रा.राजीव मेश्राम, प्रा.जांभुळकर, डॉ.चव्हाण, डॉ.अमित जगीया, डॉ.बोरकर, प्रा.साठवणे, प्रा.रंगारी, प्रा.मोहतुरे, प्रा.बागडे, कैलाश नंदुरकर, पुरुषोत्तम पात्रीकर तसेच सर्व प्राध्यापकवृंद, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थ्यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सांस्कृतिक विभागप्रमुख प्रा.नवाजी घरत यांनी केले तर आभार प्रा.गहाणे यांनी मानले.

Scanned with CamScanner

## सावित्रीबाई फुले जयंती

दि. ३ जानेवारी २०२४ रोजी मनोहरभाई पटेल कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, साकोली येथे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सी. जे. खूणे सर यांच्या मार्गदर्शनात क्रांतीज्याती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीचा कार्यक्रम घेण्यात आला. कार्यक्रमाची सुरूवात सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान प्रा. डॉ. मनोज सोनकुसरे यांनी भूषविले. यावेळी कार्यक्रमाला प्रमुख अतिथी व वक्त्या म्हणून लोकमत सखी मंचाच्या संयोजिका सौ. सुचिता आगाशे मॅडम यांची उपस्थिती होती.

सावित्रीबाई म्हणजे मायेच्या ममतेचं, साहसाचं, धाडसाचं एक मूर्तीमंत आदर्श, त्यांचा आदर्श आपल्या डोळ्यासमोर ठेवून प्रत्येकांनीच प्रेरणा घ्यावी, असे प्रतिपादन केले. कार्यक्रमाच्या सुरूवातीला सांस्कृतिक विभागप्रमुख प्रा. नवाजी घरत यांनी प्रास्ताविक केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. प्राची रणदिवे मॅडम यांना केले तर आभारप्रदर्शन डॉ. नूतन चव्हान यांनी मानले. यावेळी कार्यक्रमाला सर्व प्राध्यापकवृंद, शिक्षकेत्तर कर्मचारी आणि विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते.






Scanned with CamScanner



देशोन्नती

# मनोहरभाई पटेल महाविद्यालय साकोली येथे सावित्रीबाई फुले जयंती



साकोली ■ मनोहरभाई पटेल महाविद्यालय साकोली येथे बुधवार दि.३ जानेवारी २०२४ रोजी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.सी.जे.खुणे यांच्या मार्गदर्शनात क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती साजरी करण्यात आली. कार्यक्रमाची सुरुवात प्रतिमेचं पूजन, माल्यार्पण व दिपप्रज्वलनाने करण्यात आली.

यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी प्रा.डॉ.मनोज सोनकुसरे यांनी भुषविले. कार्यक्रमाला प्रमुख वक्त्या संयोजिका सुचिता आगाशे यांची उपस्थिती होती. प्रा.डॉ.सोनकुसरे यांनी अध्यक्षीय भाषणात सावित्रीबाईच्या कार्यकर्तुत्वावर प्रकाश टाकून बहुमोल असे मार्गदर्शन केले. तसेच सुचिता आगाशे यांनी सुद्धा मत व्यक्त केले. कार्यक्रमाच्या सुरुवातीला सांस्कृतिक विभागप्रमुख प्रा. नवाजी घरत यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.प्राची रणदिवे यांनी केले. तर आभार डॉ.नूतन चव्हान यांनी मानले. कार्यक्रमाला प्रा.राजीव मेश्राम, डॉ.अमित जगीया, प्रा.माने, प्रा.झंझाड, प्रा.कटरे, प्रा.पाटील, डॉ.काकडे, डॉ.वालोदे, प्रा.रोकडे, डॉ.साखरे, प्रा.मांढरे, प्रा.बाळबुद्धे, प्रा.फुले, प्रा.निर्वाण, बडोले, कैलाश नंदूरकर, दिनेश कापगते, मुंगमोडे तसेच महाविद्यालयीन प्राध्यापकवृंद, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थ्यांची उपस्थिती होती. (प्रति.)

Deshonnati Edition
Jan 5, 2024 Page No. 2
Powered by : eReleGo.com

## स्वामी विवेकानंद जयंती

दि. १२ जानेवारी २०२४ रोजी मनोहरभाई पटेल कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, साकोली येथे स्वामी विवेकानंद यांच्या जयंतीचा कार्यक्रम घेण्यात आला. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान प्राचार्य डॉ. सी. जे. खुणे यांनी भूषविले. कार्यक्रमाची सुरूवात प्राचार्य डॉ. सी. जे. खुणे सर यांच्या हस्ते स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमेचे पूजन व माल्यार्पण करून करण्यात आली. याप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्षमहोदय डॉ. खुणे सर यांनी राष्ट्रीय युवा दिनाचे महत्व आपल्या अध्यक्षीय भाषणातून प्रतिपादन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सांस्कृतिक विभागप्रमुख प्रा. नवाजी घरत यांनी केले तर आभारप्रदर्शन प्रा. डॉ. नूतन चव्हान यांनी केले. कार्यक्रमाला डॉ. नांदगावकर, डॉ. काकडे, डॉ. बोरकर, प्रा. मेश्राम, प्रा. भावे, प्रा. पाटील सर, डॉ. खापर्डे, प्रा. प्राची रणदिवे, प्रा. स्नेहल माने. प्रा.वैष्णवी झंझाड, प्रा. पर्वते प्रा. शिवणकर तसेच सर्व प्राध्यापकवृंद, शिक्षकेत्तर कर्मचारी आणि विद्यार्थी उपस्थित होते.

Scanned with CamScanner



प्रजासत्ताक दिन

दि. २६ जानेवारी २०२४ रोजी मनोहरभाई पटेल कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, साकोली येथे भारतीय प्रजासत्ताक दिन साजरा करण्यात आला. कार्यक्रमाचे अध्यक्षमहोदय प्राचार्य डॉ. सी. जे. खुणे यांच्या हस्ते ध्वज फडकवण्यात आला. प्रमुख अतिथी म्हणून प्राध्यापक परिषदेचे सचिव प्रा. डॉ. सी. एम. टेंभूर्णीकर, प्रा. डॉ. अमीत टेंभूर्णे, लेफ्टनंट प्रा. विलास भावे होते. एन. सी. सी. कॅडेट्स तर्फे परेड मार्च सादर करण्यात आले. याप्रसंगी एन. सी. सी. कॅडेट्स कु. हर्षा मुनिश्वर, प्रियंका चूटे, सुप्रिया सुर्यवंशी तसेच एन. एस. एस. स्वयंसेवक सुमित खुणे व हिमांशू गणवीर यांचा सत्कार महाविद्यालयाच्या वतीने अध्यक्षमहोदय प्राचार्य डॉ. सी. जे. खुणे यांचे हस्ते करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. नवाजी घरत यांनी तर आभारप्रदर्शन शारीरिक शिक्षण संचालक डॉ. अमीत टेंभूर्णे यांनी मानले. कार्यक्रमाला सर्व प्राध्यापकवृंद, शिक्षकेत्तर कर्मचारी आणि विद्यार्थी उपस्थित होते.

Scanned with CamScanner




देशोन्नती

# जिल्ह्यात सर्वत्र प्रजासत्ताक दिवस उत्साहात

## पटेल महाविद्यालय, साकोली

## द लिटिल फ्लॉवर इंग्लिश स्कूल, लाखनी

## के.डी.रामटेके महा.व नागसेन प्राथ.शाळा, दिघोरी/मोठी



Scanned with CamScanner

## हुतात्मा दिन

दि. ३० जानेवारी २०२४ रोजी मनोहरभाई पटेल कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, साकोली येथे राष्ट्रपिता महात्मा गांधी यांची पुण्यतिथी 'हुतात्मा दिना'निमित्त आदरांजलीचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. कार्यक्रमाची सुरूवात प्राचार्य डॉ. सी. जे. खुणे सर यांच्या हस्ते राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या प्रतिमेचे पूजन व माल्यार्पण करून करण्यात आली. याप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्षमहोदय डॉ. खुणे सर यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणातून महात्मा गांधी यांच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभारप्रदर्शन सांस्कृतिक विभागप्रमुख प्रा. नवाजी घरत यांनी केले. कार्यक्रमाला सर्व प्राध्यापकवृंद, शिक्षकेत्तर कर्मचारी आणि विद्यार्थी उपस्थित होते.





**देशोन्नती**

### मनोहरभाई पटेल महाविद्यालयात हुतात्मा दिन

देशोन्नती वृत्तसंकलन...



**साकोली** ■ स्थानिक मनोहरभाई पटेल महाविद्यालय साकोली येथे मंगळवार दि.३० जानेवारी २०२४ रोजी राष्ट्रपिता महात्मा गांधी यांची पुण्यतिथी 'हुतात्मा दिना' निमित्त आदरांजलीचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ.सी.जे.खुणे यांच्या हस्ते राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या प्रतिमेचे पूजन व माल्यार्पण करून करण्यात आली.

याप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ.सी.जे.खुणे यांनी हुतात्मा दिनाप्रसंगी आपल्या अध्यक्षीय भाषणातून महात्मा गांधी यांच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार सांस्कृतिक विभागप्रमुख प्रा.नवाजी घरत यांनी केले. कार्यक्रमाला प्रा.डॉ.नांदगावकर, प्रा.डॉ.सोनकुसरे, डॉ.बोरकर, डॉ.चव्हान, प्रा.मेश्राम, प्रा.रणदिवे, प्रा.माने, प्रा.झझाड, प्रा.शिवणकर, प्रा.डोंगरे, प्रा.रंगारी, प्रा.लांजेवार, प्रा.घोडीचोर, प्रा.दिघोरे, डॉ.साखरे, प्रा.मांडरे, प्रा.बाळबुध्दे, प्रा.संग्रामे, कैलाश नंदुरकर, दिनेश कापगते, पुरुषोत्तम पात्रीकर तसेच महाविद्यालयातील प्राध्यापकवृंद, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थ्यांची प्रामुख्याने उपस्थिती होती. (प्रतिनिधी)

Scanned with CamScanner

## स्वर्गीय मनोहरभाई पटेल जयंती

शुक्रवार, दि. ९ फेब्रुवारी २०२४ रोजी गोंदिया शिक्षण संस्थेचे संस्थापक शिक्षणमहर्षी स्व. मनोहरभाई पटेल यांची ११८ वी जयंती मनोहरभाई पटेल कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, साकोली येथे साजरी करण्यात आली. कार्यक्रमाची सुरूवात प्राचार्य डॉ. सी. जे. खुणे सर यांच्या हस्ते स्वर्गीय मनोहरभाई पटेल यांच्या प्रतिमेचे पूजन व माल्यार्पण करून करण्यात आली. याप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्षमहोदय डॉ. खुणे सर यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणातून स्वर्गीय मनोहरभाई पटेल यांच्या जीवनावर प्रकाश टाकतांना त्यांच्यातील दूरदर्शीपणा, दाशूरपणा, सामाजिक, राजकिय व शैक्षणिक कार्याबद्दल असणारी तळमळ याविषयी माहिती दिली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभारप्रदर्शन सांस्कृतिक विभागप्रमुख प्रा. नवाजी घरत यांनी केले. कार्यक्रमाला सर्व प्राध्यापकवृंद, शिक्षकेत्तर कर्मचारी आणि विद्यार्थी उपस्थित होते.







Scanned with CamScanner

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती

दि. १४ एप्रिल २०२४ रोजी मनोहरभाई पटेल कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, साकोली येथे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सी. जे. खूणे सर यांच्या मार्गदर्शनात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३३ वी जयंती साजरी करण्यात आली. कार्यक्रमाची सुरूवात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली. याप्रसंगी त्यांच्या पावनस्मृतीस अभिवादन करण्यात आले. महाविद्यालयात जयंती निमित्ताने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनकार्यावर आधारीत निबंध स्पर्धा, चित्रकला, वक्तृत्व, परिसंवाद, रांगोळी स्पर्धा, भीमगीत गायन स्पर्धा अशा विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. नवाजी घरत यांनी तर आभारप्रदर्शन प्रा. विलास भावे यांनी मानले. कार्यक्रमाला डॉ. अमीत जगीया, प्रा. स्नेहल माने, प्रा. वैष्णवी झंझाड, प्रा. घायले, प्रा. रामटेके प्रा. रोकडे, डॉ. साखरे, प्रा. शिवणकर तसेच सर्व प्राध्यापकवृंद, शिक्षकेत्तर कर्मचारी आणि विद्यार्थी उपस्थित होते.







सांस्कृतिक विभागप्रमुख

(प्रा. नवाजी ग्रेंदलाल घरत)

**Prof. Incharge**
**Cultural Activity**
**M. B. Patel College, Sakoli.**

Scanned with CamScanner